Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.69 ISSN No. 2456-1665

# अवघड जगणे वेचून उगवलेली कविता: कवितेच्या गावी

**प्रा. डॉ.लक्ष्मण ब. थिट्टे**
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नळदुर्ग.
मोबाईल नं. 9960618515 , ईमेल - laxmanthitte@gmail.com

**प्रास्ताविक** :

'कवितेच्या गावी' या नावाचा काव्यसंग्रह हा लक्ष्मण वाघमारे यांचा असून तो इसाप प्रकाशन याने २०१३ मध्ये प्रकाशित केला आहे. या काव्यसंग्रहात सहा भाग आहेत. प्रत्येक भागाला एक वेगळेच महत्व प्राप्त झाले आहे. त्यांनी नांदेड आकाशवाणी वरून काव्यवाचन, भाषण, अनेक वृत्तपत्रांमधून लेखन, सूत्रसंचालन, अनेक सांस्कृतिक कार्यक्रमात सक्रिय सहभाग नोंदवला. त्यांचे अनेक शोध निबंध प्रकाशित झाले.

आजचे युग हे जागतिकीकरणाचे युग आहे. म्हणून या युगात व्यक्तीचा सर्वांगीण विकास कसा होईल हे बघितले जाते. औद्योगिकीकरणाने कंपन्यांची संख्या खूप मोठ्या प्रमाणात जरी वाढली असली तरी त्यासाठी मात्र कौशल्यपूर्ण कामगाराची संख्या मात्र अजूनही कमीच असलेली दिसून येते. संगणकाच्या या युगात जग एका की वर आले आहे. पण माणूस हा माणसापासून कोसो दूर कसा गेला आहे, याचे अनेक कारणे आपल्याला १९९० नंतरच्या कालखंडात पहावयास मिळतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातून आजचा तरुण हा शिकला, सवरला, नोकरीला लागला. त्यांनी आपल्या पूर्वजावर होणाऱ्या अन्यायाची गाथा साहित्याच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न केला. त्यातून दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य, आदिवासी साहित्य अशा वेगवेगळ्या प्रवाहाची निर्मिती झाली. समकालीन विचार घेऊन खेडे व खेड्याची संस्कृती, येथील चालीरीती, गावगाडा, निवडणुका, माणसा माणसातील भेदभाव, ज्यांनी जवळून पाहिले, भोगले तेच साहित्यातून कवितेच्या साह्याने उतरत गेले. असा कवी म्हणून ज्यांचा उल्लेख केला जातो, ते कवी म्हणजे प्रा. लक्ष्मण वाघमारे हे होत. त्यांनी आपल्या जीवन जगण्याच्या खडतर प्रवासात जे त्यांच्या वाट्याला आलेले दुःख, दैन्य, दारिद्र्य, उपासमार ही या काव्याची वैशिष्ट्ये ठरलेली आहे. म्हणून त्यांच्या विचाराला नवे बळ प्राप्त व्हावे, त्यांना अजून काव्याची प्रतिभा, कल्पना व स्मृती प्राप्त व्हावी व समाजापुढे त्यांचे विचार यावे, त्या विचारांनी तिमिरातून नवे स्वप्न साकार करावे, यासाठी मी 'अवघड जगणे वेचून उगवलेली कविता: कवितेच्या गावी ' हा माझ्या शोधनिबंधाचा विषय घेतलेला आहे. त्याचा अभ्यास या लेखात करावयाचा असून तो पुढील प्रमाणे आहे.

**प्रा. लक्ष्मण वाघमारे यांची कविता**

लक्ष्मण वाघमारे हे एका खेडेगावातून आलेले, कुटुंबात अक्षरांची ओळख नसल्याने वडिलांचे खरतड काम कमी व्हावे व आईचे कष्ट कमी व्हावे यासाठी त्यांनी आपल्या जीवनाची पर्वा न करता आपल्या मुलाला शिकविले व प्राध्यापक बनवले म्हणून त्यांच्या कविता जगण्याला आत्मभान देतात असे वाटते. कारण त्यांनी महामानवाचे विचार आत्मसात केले आणि ते कृतीत आणण्याचा प्रयत्न केला. याबाबत प्रा. डॉ. म. सू. पगारे असे म्हणतात की, "माणसाच्या सर्वकश कल्याणाचा विचार मानवतावादात येतो. माणसाच्या सर्व समस्यांचे निराकरण मानवतावादात अपेक्षित आहे".[१] यावरून आपणास असे म्हणतात येईल की, मानवतावादाचा केंद्रबिंदू हा माणूस आहे. धर्म, पंथ, जात ,लिंग, वंश, देश, प्रदेश अशा कोणत्याही भेदांत विघटित करून मानवाचा विचार होऊ नये असे मानवतावादात अपेक्षित आहे. मानवाच्या सर्वकश कल्याणाचा विचार यामध्ये येतो असे वाटते. तो या कवितेतून साकार झाला आहे.

कवींचे आदर्श डॉ.बाबासाहेब आंबेडकर व महात्मा गांधी होते. दोन्हीही विचारवंतांच्या विचारांचा आपण तौलानिक अभ्यास केला तर त्यामध्ये काही साधर्म्य विचार ही जाणवतात. ते म्हणजे स्वातंत्र्य, समता, विश्वबंधुता, सामाजिक न्याय व अहिंसा या सर्व गोष्टी त्यांच्यात समान होत्या पण; डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अस्पृश्य समाजातील घटक हा शिकून शहरात गेला पाहिजे असे वाटत होते तर खेड्यातील व्यक्तींचा विकास व्हावा यासाठी खेड्याकडे चला असे म. गांधी यांना वाटत होते. कारण खेडी ही समृद्ध जेव्हा होतील तेव्हा खेड्याकडे कारखानदारी येईल पण; याच्या उलट परिस्थिती आज झालेली दिसून येते. म्हणून भगवान बुद्धाने दिलेल्या शांतीच्या मार्गाने जाण्याचा प्रयत्न कवी करतो. तो असे म्हणतो की,

"म्हणून हे शांतिदूता! तुझंच पंचशील अन
शांतीचा मार्गच विश्वाला सुख दावी" [२]

(तुझेच पंचशील, पृष्ठ क्र.१९)

जागतिकीकरणाच्या युगात मानव हा मानवाचा द्वेश करू लागला. नातेसंबंध विसरू लागला. द्वेष, मत्सर, कामुकता यात तो पूर्ण गुरफाटला. म्हणून त्याला आज पंचशीलाचे असणारे तत्वचे पालन करून शांतीचा मार्ग त्याने अंगीकारला पाहिजे असे वाटते.

हजारो वर्षाचा इतिहास जर बघितला तर दलित व्यक्तीला शिक्षणाचा असणारा अधिकार नव्हता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उच्च शिक्षण घेऊन आपल्या समाजालाही शिका, संघर्ष करा व संघटित व्हा! असा मंत्र दिला. याबाबत डॉ.बाळकृष्ण कवठेकर असे म्हणतात की, "दलित साहित्याची प्रेरणा, त्यांचे तात्विक अधिष्ठान त्यांच्या दलित साहित्यिकांना अभिप्रेत असणाऱ्या आणि इतरांनाही जाणवणाऱ्या पृथकत्वाची समर्थ वैशिष्ट्ये या साऱ्यांचा प्रभावी आढळही दलित कवितेमध्येच होतो."[३] यावरून आपणास असे म्हणता येईल की, दलित साहित्यातून दलित जीवनाचे यथार्थ वर्णन काव्यातूनच अधिक समर्पकरित्या अभिव्यक्त झालेले आहे.दलित कविता हा एक दलित आशयाचे क्षितिज, सामर्थ्य विस्तारण्यात अग्रभागी

व्यवच्छेदकाची भूमिका घेताना दिसतो. कारण हजारो वर्षाचा काळोख डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या क्रांतीच्या लेखणीने उद्याचा सूर्य होऊन प्रकाशमान झाला. म्हणून कवी म्हणतात की,

"केव्हा बाबा तुम्ही आलात
क्रांतीसुर्य होऊन
अंधारलेली वस्ती प्रकाशमान करण्यासाठी
आमच्यातली अस्मिता जागी करण्यासाठी"

(बाबा तुम्ही, पृष्ठ क्र.२०)

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटना व बौद्ध धम्माच्या माध्यमातून स्वातंत्र्य, समता व बंधुत्वाचा संदेश दिला आणि दलितांचे आत्मभान त्यामुळे जागृत होऊन जगण्याची एक नवी उमेद त्यांना प्राप्त झाली. घटनेने दिलेले अधिकार व धम्माच्या माध्यमातून नवी शिकवण यामुळे दलित वर्ग हा स्वाभिमानाचे जीवन जगू लागला.

बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आत्मसात करणारी १९६० नंतरची पहिली पिढी ही शिकली व साहित्य लिहू लागली. त्यामध्ये प्रथमता: अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, बाबुराव बागुल, योगीराज वाघमारे, प्र. ई. सोनकांबळे, दया पवार, आरती प्रभू, भीमसेन देठे, किसन भागू बनसोडे यासारख्या विचारवंतांनी अन्यायाला वाचा फोडणारी कोंडी फोडण्यासाठी वेदना, विद्रोह व नकार या दलित साहित्याच्या मूलमंत्राचा स्वीकार केला. म्हणून कवी अण्णाभाऊ साठे यांच्या विषयी लिहितात की,

"अण्णा तुमची लेखणीही
अशी धारदार होती
जणांच्या व्यथावेदनांना
वाचा फोडणारी होती"

(लेखणी, पृ. क्र. २१)

अण्णाभाऊ साठे यांनी फकीरा, वारणेचा वाघ, कुळवाडी यासारख्या अनेक साहित्यातून दलित समाजाचे जीवनानुभव व्यक्त केले. म्हणून याबाबत डॉ. प्रमोद गारोडे असे म्हणतात की,"प्रस्थापित, उच्चवर्णीयांच्या साहित्याने ज्या शोषित, अन्यायी दलित पीडितांना साहित्यातून चित्रित केले नव्हते, त्या दलित, शोषित, कष्टकरी समाजाला नायकत् देण्याचे महत्त्वाचे कार्य अण्णाभाऊंनी केले."[४] यावरून आपणास असे म्हणता येईल की, कष्टकरी समाजाचे, शेतकऱ्यांचे, कामगारांचे, दलितांचे, शोषितांचे, पिडीतांचे वास्तव जीवन त्यांनी आपल्या साहित्यातून व्यक्त केले आहे. असे वाटते.

महात्मा गांधी यांच्या विचाराने ही कवी भारावून गेले आहे. महात्मा गांधी यांच्या स्वप्नातील भारत म्हणजे 'खेडे' हा होता पण; राजकारणाच्या बदलत्या सूत्राने, घुसखोरीने तेच समृद्ध खेडे द्वेषला कारणीभूत ठरलेले आहे. खेड्यातून जन्मलेले राजकारणी कार्यकर्ते व्यक्ती निवडणुकीमध्ये पैसा वाटून मत मिळवतात व निवडून आल्यावर समाजाचा, गावाचा विकास

करण्याऐवजी स्वतःच सगळ्या योजनांचा फायदा घेऊन तृप्तीचा ढेकर देतात. म्हणून कवी म्हणतो की,

"खरा भारत खेड्यात आहे
गांधीबाबांनी सांगितलय म्हणून
गावात साहित्यिकांची लेखणी गेली
अन राजकारणानेही घुसखोरी केली"

(गांधीबाबा, पृ. क्र. २२)

म. गांधींनी देशात अहिंसेचे बीज पेरले पण; आज देशात हिंसाचार, बलात्कार, दहशतवाद, ढोंगीपणा मोठ्या प्रमाणात वाढला आहे. भारत देश सुखी समृद्ध होता. योग, विज्ञान, तंत्रज्ञान आणि पृथ्वीच्या उत्पत्तीचा सिद्धांत भारतीय ऋषी मुनींनी, तत्त्ववेत्यांनी ग्रंथाच्या साह्याने ग्रंथामध्ये मांडला. या देशात अनेक जाती धर्माचे लोक काश्मीर पासून ते कन्याकुमारी पर्यंत मोठ्या गुण्यागोविंदाने राहत होते पण; सत्तेच्या लालसेपोटी मानवतावादी विचारापासून ते कोसोदूर गेलेले आहेत असे दिसते. म्हणून कवीला ज्या कष्टाने आई-वडिलांनी घडवले, त्यांची परिस्थिती हलाखीची होती, त्यांच्या कष्टाला पारावर नव्हता,पायाला कुरूप असतात पडणारे घट्टे हेच त्यांच्या कष्टाचे भांडवल होतं. ऊन, वारा, पाऊस, वादळ जरी असले तरी भाकर मिळविण्यासाठी अहोरात्र कष्ट करावे लागत असायचे. त्यांच्या हाताला कधी काम लागत तर; कधी लागत नसायचे पण; त्यांनी कष्ट करून आपल्या मुलाला शिकवलं, मोठं केलं म्हणून कवी म्हणतात,

"रणरणतं ऊन असायचं
पशुपक्षी सावलीला दडायची
तू मात्र राबायचास
माझ्या भविष्यासाठी"

(बा तू, पृ. क्र. २७)

त्यांच्या वडिलांना वाटत असायचे की आपल्या मुलाने शिकले पाहिजे, सुसंस्कृत झाले पाहिजे व उद्याचा आदर्श नागरिक म्हणून आपली ओळख निर्माण केली पाहिजे. म्हणून कवी दहावी पास झाल्यावर कवीच्या वडिलांचा आनंद हा गगनात मावला नाही. ग्रामीण भागात शेतकऱ्यापेक्षा शेतावर मजुरी करणाऱ्या मजुरांची वेगळीच कहाणी असते.दारिद्र्याच्या खुराड्यात वावरणारा तुटपुंजा संसार, मुलं मोठी झाल्यानंतर त्यांचे शिक्षण, लग्न यासाठी त्याला सालं घालावे लागायचे व त्यातच त्यांची अर्धी जिंदगी जायची. म्हणून कवी म्हणतात,

"पोरीच्या लग्नाचं करजं फिटना
सालोसाली बाची सालदारी सुटना"

(बाची कानी, पृ. क्र. २८)

मुला मुलींच्या लग्नासाठी घेतलेले कर्ज फिटत नसल्याने त्याला वेठबिगारी म्हणून राहावे लागत होते. त्याच्या आयुष्यात कधी ओला दुष्काळ तर कधी कोरडा दुष्काळ यायचा आणि यातच तो संपून जायचा. म्हणून कवी म्हणतात,

"तू कष्टत-कष्टत आमच्यातून निघून गेलास
तुझ्या माघारी ही मायना मला
तळ हाताच्या फोडा प्रमाणे जपलं
तिलाही मी शिकून मोठा व्हाव वाटलं"
(फळ, पृ. क्र.२९)

कवीच्या वडिलांना असा विश्वास होता की, शिकल्यामुळे सावली मिळते म्हणून त्यांनी आपल्या मुलांना शिकवले. त्यांना अर्ध्यावरच आपला संसार टाकून जावे लागले पण; त्यांच्या आईने मोठ्या कष्टाने वयाची साठी गाठली असली तरी काबाडकष्ट करून मुलाला शिकविले. याबाबत डॉ. वासुदेव मुलाटे असे म्हणतात की, "खेड्यातील जीवन हे प्रामुख्याने कृषी केंद्रित जीवन आहे परंतु आज खेड्यातून भौतिक पातळीवर होणाऱ्या सुधारणा आणि बदल लक्षात घेतले तर पारंपरिक खेडे आज नष्ट होत आहे असे दिसते." [१] अशा संक्रमण अवस्थेमुळे खेड्यात राहणारा समाज व समाज जीवन हे संपूर्ण बदलून परिश्रमाशिवाय पर्याय नाही असे वाटते. म्हणून कवीला आपल्या जगण्याच्या खूप वेदना होताना दिसतात. कवीची आई मजुरीला जाण्यासाठी पहाटेच उठून भाकरी करून पाटलाच्या इथे मजुरीला जात असायची. पायात काहीही नसायचे. नाटीला दांड भरून घालावे लागायची. दिवसभरच्या मजुरीने दहा-बारा रुपये येत असल्याने त्यातच मीठ आणि पीठ खरेदी करावे लागत असे. तिने आपल्या पोटाला पीळ घालून, विधवा असूनही मुलाला शिकविणे. म्हणून ते आदर्श झाले, अमर झाले. म्हणून कवी आई विषयी म्हणतो,

"दिवसभर पोटाला पिळ द्यायचीच
तेव्हा यायची तुझी दहा-बारा रुपये मजुरी
त्यातूनच आणायचीस शेर -पावशेर ज्वारी"
(माय तुझे, पृ. क्र.३०)

माय माऊली ने दारिद्र्याची चटके सोसले. गावात काम नाही म्हणून ती शहरात जाऊन बिल्डिंगची कामे करू लागली. आंबील-कोंडा खाऊन लेकरं मोठाली केली. डॉ. बाबासाहेबांमुळे तू साहेब झालास म्हणून तुला सांगते डोक्यात टेन्शन घेऊ नको, मोडक्याकाठीसाठी संसार सोडू नको हे जीवनातले तत्त्वज्ञान त्याची आई त्यांना सांगते. म्हणून कवी म्हणतात,

"या मोडक्या काठीला शहरातलं छेत झेपायचं नाही
गावातलं छप्परच आता आधार मला देई"
(आधार,पृ. क्र.३२)

शहराच्या भकास वस्तीतलं जीवन त्यांच्या आईला नको वाटते, कारण त्या वयोवृद्ध झालेल्या असल्याने त्यांना गावची ओढ लागते. त्यांना राहायला घर नसल्याने त्यांच्या आईने

झोपडीमध्ये संसार केला. पहाटे उठून जात्यावर दळण दळणे, सडा सारवण करणे व अनवाणी पायाने उपाशीपोटी पाटलाच्या इथे निंदायला जाणे, निंदून आल्यावर घरी भाकरी करणे, आलेल्या पैशातून संसार करून उरलेला पैसा गाठीला बांधून ठेवत असे. जो पैसा मुलांच्या शिक्षणाला उपयोगी पडेल असे त्यांना वाटत असे. मुले मोठे झाल्यावर नोकरीला लागल्यावर आपण आता सुखाने दोन घास खाऊ असे आईला वाटते पण; ते सुखही त्यांना मिळत नाही. खेड्यात ग्रामपंचायतच्या निवडणुका आल्या की, सारेच दृश्य बदलते. प्रचारसभा या जातीवर आधारित असतात. म्हणून त्या काळात हिंसाचाराला खात पाणी घातले जाते. दहशतवाद, साम,दाम,दंड,भेद या सूत्राचा वापर करून मते मिळवले जातात. निवडणुकीत व्यक्तींच्या मनाचा, भावनांचा विचार केला जात नाही. त्यामुळे सबंध समाजालाच एक बाजाराचं स्वरूप प्राप्त होतं. याबाबत कवी म्हणतो,

"कधी केव्हा कुठे आणि
कशाचा बाजार भरेल
काहीच सांगता येत नाही
माणसं कशाचाही सौदा
करतील यात नवं नाही"

(मताचा बाजार,पृ. क्र. ३९)

यातून कवीची संवेदनशीलता जागृत होते असे वाटते. कवीने निर्माण केलेल्या कविता संग्रहाचे प्रकाशन होते. तेव्हा कवीला खूप आनंद होतो पण; तो आनंद क्षणात विरून जातो. कारण,कोणत्याही कवींची कविता तेव्हा श्रेष्ठ होते जेव्हा समीक्षकांनी त्यावर व्यवस्थित अभिप्राय दिल्यावर. कवी हा प्रतिभा साधन असतो. त्याला शब्दाचे ओझे वाहून फिरावे लागत नाही. तर प्रत्येक शब्द त्याला स्मृतीच्या साह्याने स्फुरत असतो. कवीने निर्माण केलेली कविता जर समीक्षकांनी गुण दोषासह स्वीकारली तर त्यांना अजून नवी उर्मी येईल आणि तो त्याहीपेक्षा सरस कलाकृती सादर करेल पण; तसे आज होताना मात्र दिसत नाही. याबाबत कवी म्हणतो,

"प्रकाशन सोहळ्याचा पाहुणा म्हणतो
'र 'ला 'ट 'जोडणारा मुळात कवीच नसतो
तेव्हाच मी गोंधळून जातो"

(कवितेच्या गावी, पृ. क्र.४१)

जीवनाच्या प्रवासात अनेक माणसे कवीला भेटतात. गरिबी,दारिद्र्य, उपासमारी यांचा सामना त्यांना करावा लागतो. अशीच एक वृद्ध म्हातारी स्त्री डोक्यावर लाकडाची मोळी घेऊन जाताना कवीला भेटते. ती त्यांना सांगते की, माझा मुलगा बिमारीने मरण पावला. त्यामुळे मला पोट भरण्यासाठी, भाकरी मिळवण्यासाठी या वयात सुद्धा काम करावे लागते. त्यामुळे लेखकाला म्हातारीच्या या बोलण्याने अश्रू अनावर झाले नाही मराठवाडा भूभाग नेहमी अवर्षणाच्या

खाईत सापडलेला असतो. त्यामुळे येथे गरीबी, दारिद्र्य उपासमार हे नेहमी होते. म्हणून येथील व्यक्तींच्या व्यथा, वेदना, दाहकता या मानवतेला लाजवणाऱ्या असतात. याबाबत कवी म्हणतात,

"काम करू बापू मलाही पोट हाय
चाऱ्याच्या भाऱ्या बिगर चालत न्हाय
म्हणून शानी चाऱ्याचा भारा नांदेडला आणते
तवा कुठे पोटाला भाकर मिळते "

(प्रवास, पृ. क्र.४२)

म्हातारपण आलं तरी मराठवाड्यातील व्यक्तीला काम चुकत नाही याची खंत कमी व्यक्त करतो. कारण मन आणि भावनांचा बाजार भरला तर माणूसपण संपण्याची भीती कवीला वाटते.

कवी हा कुटुंब, समाजात, नातलगात वावरणारा असल्याने नात्यांची त्यांची नाळ घट्ट रुतलेली असते. कुटुंबात मुलं जसजशी मोठी होत जातात, तस-तशी त्यांची काळजी सुद्धा वाढते. याबाबत कवी म्हणतात,

" आज तू कालची चिमुकली राहिली नाहीस
ज्ञानरूपी बीचे पेरणारी आधुनिक सावित्री झालीस"

(आठवणी, पृ. क्र. ४४)

मुलींच्या वाढत्या वयाने बाप खंगतो पण; त्याच बापाने जर तिला शिक्षण दिले तर ती स्वतःच्या पायावर उभे राहून समृद्ध जीवन जगेल. अशी आशा कवीला वाटते.आजच्या युगात परीक्षेचे बदललेले स्वरूप अधोरेखित करताना कवी व्याकूळ होतो. तो म्हणतो,

"परीक्षेचे स्वरूप झालंय आता न्यारे
पोराऐवजी बापालाच पडले भारी कोड"

( परीक्षा, पृ. क्र. ४६)

मुलांनी अभ्यासात हुशार व्हावं असं प्रत्येक पालकांना वाटत असते पण; परीक्षा पद्धती बदलली, तिचे गांभीर्य मुलांना राहिलेले नाही म्हणून परीक्षेच्या दिवशी परीक्षा केंद्रावर पालकांचीच जास्त गर्दी असताना दिसते. तंत्रज्ञानाच्या युगात प्रश्न पत्रिका फुटणे, त्यातील घोटाळे बघून कवीला आजच्या विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आहे असे वाटते.
जीवन जगताना अर्थ शून्य जीवन आपल्या वाट्याला येते. अनेक विकार जडतात. पावला पावलावर काटे पेरले जातात. त्यातूनही वाट काढायची म्हणजे स्वतःची वाटच संपून जाते.

निसर्ग आणि मानव यांचं तूट नातं आहे. मानव हा निसर्गाचाच घटक आहे. ऊन, वारा, पाऊस, थंडी या ऋतुचक्रातून जसे निसर्गाला जावे लागते, तसेच मानवालाही याचा सामना करावा लागतो. पाणी हा अतिशय महत्त्वाचा घटक. पाण्यामुळे धरती मायेला नवी नव्हाळी येते. शेती चांगली पिकते. शेतकऱ्याचे घर धनधान्याने भरून जाते. म्हणून कवी म्हणतात,

"सांग धरणी माय तुझे उपकार कसे फेडीन
जाईल घर मज धनधान्यानं भरून
मग धनधान्यानेच तुला ओवाळीन"
(आला मिरुग- मिरुग, पृ. क्र. ५०)

मराठवाड्याचा दुष्काळ कमी करण्यासाठी वृक्ष तोडण्या ऐवजी त्याची लागवड केली पाहिजे. पाणी आडवा, पाणी जिरवा या योजनांचा परिपूर्ण अमल केला पाहिजे असे कवीला वाटते. यातून कवीच्या गावाकडच्या आठवणी जाग्या होतात. गावात सर्व व्यक्ती एकोप्याने नांदत असतात. गावगाडा त्यावर आधारित असतो. तेथील व्यक्तीं स्वार्थी, प्रेमळ असतात पण; गावाच्या त्या नंदनवनाला जागतिकीकरणाची,राजकारण्यांची नजर लागले आणि ढासळत चालते जातीय संस्थेचे कुटुंब संस्थेचे एक एक बुरुज. कारण गावात स्वार्थी मतलबी व्यक्तींचा शिरकाव झाला आणि नंदनवन यांचे वाळवंट झाले. म्हणून तो म्हणतो,

" एकेकाळी नंदनवन असणाऱ्या
गावाचंच वाळवंट बनलय
ना राहिला इथं जिव्हाळा ना एकीचा भाव
असा झालाच मतलबी गाव"
(गाव, पृ. क्र. ५५)

या मतलबीपणामुळे गावातील स्वयराचार वाढला. स्त्रिया-मुली असुरक्षित झाल्या. त्यांना स्वतःची इज्जत अब्रू वाचवण्यासाठी अनेक संकटांचा सामना करावा लागला. त्यातल्या त्यात ज्या स्त्रीला मुळबाळ होत नाही, त्या स्त्रीकडे वाईट नजरेने बघनाऱ्यांची संख्या खूप वाढू लागली. पुत्र सुखासाठी व्यक्ति वाट्टेल ते करण्यासाठी तयार होत. देव, धर्म यांच्या आहारी जाने. हे सर्व झाल्यावर मग दवाखान्यात जाने. तेथे टेस्टट्यूब बेबीचा पुरस्कार करते पण; त्यातून जर मुलगी जन्माला आली तर ती संपवायचा प्रयत्न करते. म्हणून ती टेस्टट्यूब बेबी मधील मुलगी आपल्या आईला बोलते.

"मम्मी पप्पा तुम्हा सांगने
नेहमी तुमच्या उदरी येते
नका संपवू मला तुम्ही
हात जोडूनी विनविते"
( विनविते,पृ. क्र. ५७)

गर्भात असणाऱ्या मुलीची सोनोग्राफी केली जाते. म्हणून ते विणवते की मला उद्याचा उशकाल बघू द्या मी जननी माता आई पहिली स्त्री त्वचा सर्व नात्यांना मी जपेल. मला जन्म घेऊ द्या. अशी विनवणी ती करते.

शोषित, पीडित व्यक्तींच्या बरोबरच समाजातील वेश्या व्यवसाय करणाऱ्या दुःखी स्त्रियांचेही चित्रण केलेले दिसून येते. ती जगण्यासाठीच सजत असते. कारण, तिचे ते पोटभराचे

साधन, त्यामध्ये तिने शोधले. तिचे सजने कवीला संभ्रमात टाकते. कवीला वाटते ती पतीसाठी की, अजून कोणासाठी सजते. याचा तो शोध घेतो. अंतिम सत्य त्यांना कळते. म्हणून तो म्हणतो,

"आज तिच्या सजण्याचं गुड मला कळलं होतं
पोटाच्या आगे पायी तीन स्त्रीत्व गमावलं होतं
तेव्हा जगण्यासाठीच तीचं सजनं होतं'

(सजनं, पृ. क्र. ६०)

ती स्वतःला सजवते. पुरुष तिच्याकडे आकर्षित होतात पण; तिचा त्यातून स्त्रीत्वाचा ठेवा उध्वस्त होतो. त्याचे वर्णन ते करतात. अशा प्रकारे कवी लक्षण वाघमारे यांनी कवितेच्या गावी या काव्यसंग्रहातून आपल्या गावाचे, गावात घडणाऱ्या विविध घटनांचे वर्णन केले आहे.

**निष्कर्ष:**

'कवितेच्या गावी' या काव्यसंग्रहात संवेदनशील मनाची काव्य अभिव्यक्ती कवीने साकार केली आहे. कवीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, अण्णाभाऊ साठे आपले आई-वडील हे प्रेरणास्थानी वाटतात.त्यांच्या कष्टाचं चीज व्हावं याची जाणीव त्यांना आहे. म्हणून तो शिकतो. मोठा होतो. हा कृतज्ञ भाव त्यांच्या ठिकाणी भरला आहे. समाज,संस्कृती, गावगाडा, राजकारण हे समकालीन प्रश्नांनी कसे ग्रासलेले आहेत याची उकल त्यांनी या काव्यसंग्रहात केली. निसर्गाशी मानवाचे नाते किती दृढ आहे याचा उल्लेख त्यांची कविता करते. कवीचं जगणं त्या समाजाशी, गावाशी जे नाते आहे ते जपण्याचा प्रयत्न त्यांनी केला. शिक्षणाला प्राधान्य दिले. मुलगा -मुलगी समान आहेत त्यासाठी पालकांनी व शासनाने प्रयत्न करावा. समाजात स्त्रीचे स्थान अतिशय महत्त्वाचे आहेत. म्हणून त्यांना अपमानित न करता, त्यांचा छळ न करता, त्यांना समानतेची वागणूक द्यावी हा संदेश कवी या कवितेमधून देतो.

**संदर्भसूची:**

१. प्रा. लक्ष्मण वाघमारे: कवितेच्या गावी, ईसाप प्रकाशन, नांदेड प्र.आ. 2013 पृ .क्र.१९.
२. डॉ. म.सू. पगारे: साहित्यातील मानवतावाद, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, प्र.आ. पृ. क्र.३११
३. डॉ.बाळकृष्ण कवठेकर: दलीत साहित्य:एक आकलन, विजय प्रकाशन, नागपूर, प्र. आ. पृ.क्र.१७.
४ डॉ. प्रमोद गारोडे: अण्णाभाऊंचे कादंबरी विश्व, कमल प्रकाशन, ठाणे, प्र.आ. २००६ पृ. क्र.३५.
५. डॉ.वासुदेव मुलाटे: ग्रामीण साहित्य चळवळ, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ. ९ ऑगस्ट २००५, पृ. क्र. २७.
६. रा. र . बोराडे : ग्रामीण साहित्य,संस्कृती, प्रकाशन,पुणे, द्वितीय आवृत्ती २६ फेब्रुवारी २०१०, पृ. क्र. १४.